Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. १४ मे २०२६ । वर्ष १ । अंक ३९ । पाने २ ।
DIGITAL EDITION

पंतप्रधानांच्या आवाहनाचा ज्वेलरी कंपन्यांना फटका!



(पान २ वर)

## » Selected

### सौरऊर्जा प्रकल्प धारकांपैकी केवळ ०.१४ टक्के ग्राहकांनाच वीज

मुंबई: छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना अधिभार लागू होणार नसल्याचे स्पष्टीकरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) देण्यात आले आहे. एकूण वीज ग्राहकांपैकी केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांनाच हा अधिभार लागू झाल्याचे महावितरणने स्पष्ट केले. राज्यामध्ये सरसकट सर्व ग्राहकांवर हा अधिभार लागू होणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र ते पूर्णपणे चुकीचे आहे. महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार (ग्रीड सपोर्ट चार्ज) लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली. ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे.

## तेल संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचे ७ मोठे निर्णय

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे काटकसरीचे आदेश!

### मंत्री-अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द; ताफे अर्ध्यावर, सरकारी विमान वापरावर निर्बंध

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी : जागतिक तेल संकट आणि वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने मोठे निर्णय घेत प्रशासनात काटकसरीचे धोरण लागू करण्यास सुरुवात केली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय बैठकीत सात महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केले.**

या निर्णयांमुळे मंत्र्यांच्या ताफ्यांपासून सरकारी विमानांच्या वापरापर्यंत अनेक बाबींवर निर्बंध येणार आहेत.मुख्यमंत्री कार्यालयात पार पडलेल्या बैठकीला मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. इंधन बचत, परकीय चलनाचा काटकसरीने वापर आणि ऊर्जा संवर्धन यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना राबवण्याचे निर्देश देण्यात आले.

**मंत्र्यांचे ताफे अर्ध्यावर**

1. राज्य सरकारच्या निर्णयानुसार मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणली जाणार आहे. जिल्हा दौऱ्यांदरम्यान ताफ्यात अतिरिक्त वाहने असणार नाहीत याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांवर टाकण्यात आली आहे. यामुळे इंधनाचा वापर कमी करण्यास मदत होणार असल्याचे सरकारचे मत आहे.





**विदेश दौऱ्यांवर निर्बंध**

2. राज्याचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सर्व विदेश दौरे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अत्यावश्यक परिस्थिती वगळता कोणत्याही अधिकाऱ्याला विदेश प्रवासास मंजुरी दिली जाणार नाही. परकीय चलनाची बचत करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**सरकारी विमान आणि हेलिकॉप्टर वापरावर अटी**

3.मंत्री आणि अधिकाऱ्यांनी शासकीय विमान किंवा हेलिकॉप्टरचा वापर फक्त अत्यावश्यक प्रसंगीच करावा, असे आदेश देण्यात आले आहेत. अन्य वेळी नियमित विमानसेवा किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

**सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणार**

4. राज्य सरकारने मंत्री आणि अधिकाऱ्यांना मेट्रो, बस यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. पहिल्या टप्प्यात आठवड्यात किमान एक दिवस सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करण्याचा प्रयोग राबवण्यात येणार आहे.

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला प्राधान्य**

5. अनावश्यक प्रवास टाळण्यासाठी मंत्रालयातील बैठका आता मोठ्या प्रमाणात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात येणार आहेत. अधिकाऱ्यांना मुंबईत बोलावण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून चर्चा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या विविध विभागांना वितरित करण्यात आलेल्या वाहनांचाही पुनरावलोकन करण्यात येणार आहे.

### पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद

मध्यपूर्वेतील तणावामुळे हार्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्याचा परिणाम भारतातील इंधन दर आणि परकीय चलन साठ्यावर होत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधन बचतीचे आवाहन केले होते. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक, वर्क फ्रॉम होम आणि काटकसरीचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# फुले मार्केटमध्ये मनपाची कारवाई!

### अनधिकृत हॉकर्सचे धाबे दणाणले

**जन सम्राट टाईम्स**





**जळगाव | प्रतिनिधी:** शहरातील गजबजलेल्या फुले मार्केट परिसरात वाढत्या अतिक्रमणाविरोधात महानगरपालिकेने मंगळवारी मोठी धडक कारवाई करत अनधिकृत हॉकर्सविरोधात मोहीम उघडली. वाहतूक कोंडी, स्वच्छतेच्या समस्या आणि नागरिकांच्या हालचालींना होणारा अडथळा लक्षात घेता अतिक्रमण निर्मूलन पथकाने अचानक कारवाई करत गल्लीबोळांमध्ये लपवून ठेवलेल्या हॉकर्सच्या पेट्या आणि इतर साहित्य जप्त केले. या कारवाईमुळे अनधिकृत व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली असून अनेकांचे धाबे दणाणले आहेत.फुले मार्केट परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर बनला होता. रस्त्यांवर आणि पदपथांवर अनधिकृतपणे व्यवसाय थाटल्यामुळे नागरिकांना चालणेही कठीण झाले होते. तसेच बाजारपेठेत दिवसभर वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होत होती. या संदर्भात नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत होत्या. काही दिवसांपूर्वी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज काळे आणि स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी फुले मार्केट परिसराची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला होता.अतिक्रमण हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच नगरसेवक रमेश मतानी यांनीही लेखी निवेदनाद्वारे बाजार परिसरातील वाढत्या अतिक्रमणाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती.

### नागरिकांकडून कारवाईचे स्वागत

मनपाच्या या कारवाईमुळे फुले मार्केट परिसरातील वाहतुकीला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या या पावलाचे स्वागत करत नियमितपणे अशी मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे. बाजारपेठेतील अतिक्रमण हटवल्यास व्यापारी, ग्राहक आणि वाहनधारकांना मोठा फायदा होईल, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली.

---

## जळगावात चोरट्यांचा हैदोस; एकाच रात्री ३ घरफोड्या, वाघनगर परिसरात दागिने, रोकड लंपास

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी** ; शहरात दिवसेंदिवस घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, चोरट्यांनी आता थेट निवासी भागांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. शहरालगतच्या वाघनगर परिसरातील राजे संभाजी चौकात एकाच रात्री तब्बल तीन घरांवर डल्ला मारत चोरट्यांनी दहशत निर्माण केली. दोन बंद घरांचे कडीकोयंडे तोडून चोरट्यांनी सुमारे ५४ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड लंपास केली, तर तिसऱ्या घरात चोरीचा प्रयत्न फसल्याने चोरट्यांना रिकाम्या हाताने पळ काढावा लागला. या सलग घरफोड्यांमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील एका कुटुंबाने नुकतेच नवीन घरात स्थलांतर सुरू केले होते. घरातील सामान हलवण्याचे काम सुरू असल्याने कुटुंबीय रात्री नवीन घरात मुक्कामी गेले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी जुन्या घराचा दरवाजा फोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटे उचकून त्यांनी सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरून नेली. सकाळी घरात चोरी झाल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. याच भागातील आणखी एका घरातही चोरट्यांनी हात साफ करत चांदीच्या मूर्ती आणि रोख रक्कम लंपास केल्याचे उघड झाले. तर तिसऱ्या घरात चोरट्यांनी प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, मात्र तेथून कोणताही ऐवज हाती न लागल्याने त्यांनी तेथून पलायन



केल्याची माहिती समोर आली आहे. एकाच रात्री तीन घरफोड्या झाल्याने वाघनगर परिसरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. विशेषतः उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे बाहेरगावी जात असल्याने बंद घरांवर चोरट्यांची नजर असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगू लागली आहे. रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलिसांचा तपास सुरू दरम्यान, या प्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. चोरीमागे एखाद्या सराईत टोळीचा हात असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, पुढील तपास सुरू आहे. नागरिकांची प्रशासनाकडे मागणी शहरात सातत्याने वाढणाऱ्या घरफोड्यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. रात्रीच्या वेळी गस्त वाढवणे, संशयितांवर लक्ष ठेवणे आणि संवेदनशील भागांमध्ये पोलिस बंदोबस्त वाढवण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. “चोरट्यांचा वाढता धुमाकूळ रोखण्यासाठी पोलिसांनी तातडीने कठोर पावले उचलावीत,” अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली.

---

## “आम्ही पोलीस आहोत” सांगत वृद्धाची फसवणूक

### ११ लाखांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने लंपास; पोलिसांत गुन्हा दाखल

**जन सम्राट टाईम्स**

जळगाव : शहरात चोरी, घरफोडी आणि फसवणुकीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतानाच आता पोलिस असल्याचे भासवून एका वृद्धाची तब्बल ११ लाखांहून अधिक किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात दोन अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माधव पीतांबर



पाटील (वय ७१) हे मूळचे जळगाव तालुक्यातील जळके येथील रहिवासी असून सध्या उल्हासनगर येथे वास्तव्यास आहेत. ते एका कौटुंबिक लग्नसमारंभासाठी १० मे रोजी जळगाव शहरातील खोटेनगर परिसरातील विश्रामनगर येथे आले होते. दुपारी सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास ते आपल्या नातवासोबत दुचाकीवरून ‘हॉटेल क्रेझी होम’ येथे लग्नासाठी जात होते. दरम्यान, महामार्गावरील आर.एल. हॉस्पिटलजवळ पोहोचताच रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ४० ते ४५ वयोगटातील दोन व्यक्तींनी त्यांना थांबवले. संबंधितांनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगत दुचाकीचे कागदपत्र आणि लायसन्स तपासण्याच्या बहाण्याने चौकशी सुरू केली. यावेळी त्यांनी यापूर्वीही एका अन्य दुचाकीस्वाराला अडवून चौकशी केल्याचे दिसून आले. यानंतर आणखी दोन व्यक्ती दुचाकीवर तेथे आल्या आणि परिसरात सोनसाखळी चोरीच्या घटना वाढल्याचे सांगून निघून गेल्या. त्यानंतर भामट्यांनी वृद्धाचा विश्वास संपादन करत, “पुढे सोने लुटीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे तुमच्याकडील दागिने सुरक्षित ठेवण्यासाठी आम्हाला द्या. आम्ही ते कागदात बांधून देतो,” असे सांगितले. भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवत माधव पाटील यांनी त्यांच्या अंगावरील ३.५ तोळ्यांचे सोन्याचे ब्रेसलेट, २ तोळ्यांची सोन्याची चेन तसेच तीन सोन्याच्या अंगठ्या असे एकूण ११ लाखांहून अधिक किमतीचे दागिने त्या दोघांकडे दिले. आरोपींनी दागिने कागदाच्या पुडीत बांधून पुन्हा पाटील यांच्या हाती दिले आणि त्यांना पुढे जाण्यास सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे समजताच माधव पाटील यांनी तातडीने जिल्हापेठ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

---

## राष्ट्रवादीची तिजोरी पवार माय-लेकरांच्या हाती!

### आर्थिक व्यवहारांचे अधिकार तिघांकडेच

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली:** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीतून ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांना डच्चू देऊन पक्षाचा संपूर्ण निधी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार या माय-लेकरांनी हाती घेतला असून या खेळीमुळे पक्षाच्या आर्थिक नाड्यांबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर अजित पवार कुटुंबीयांनी आता पकड मिळवली असल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची नवी यादी २९ एप्रिल रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवण्यात आली. या यादीमध्ये सुनेत्रा पवार राष्ट्रीय अध्यक्ष, पार्थ पवार राष्ट्रीय महासचिव, जय पवार राष्ट्रीय सचिवपदी नियुक्त झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. पवार कुटुंबीयांतील पार्थ व जय या पदाधिकाऱ्यांच्या कामाच्या वाटपामध्ये पार्थ पवार यांच्यावर पक्ष संघटनेमध्ये समन्वयाची जबाबदारी असेल. तर जय पवार राष्ट्रीय शिस्तपालन समितीचे अध्यक्ष राहतील, त्याचबरोबर ते खजिनदाराची जबाबदारीही पार पाडतील. पक्षाच्या अन्य राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांकडेही विविध कामांचे वाटप करण्यात आले आहे. शिवाजीराव गर्जे यांचे खजिनदार पद कायम असले तरी त्यांच्याकडे मुख्यत्वे लेखापरीक्षण आणि हिशेबाचे काम देण्यात आले आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या कामाच्या नव्या वाटपामुळे पक्षाच्या आर्थिक निधीची सूत्रे पूर्णपणे पवार कुटुंबीयांच्या हाती आली असल्याचा दावा सूत्रांनी केला.राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्याही अधिकृत आर्थिक व्यवहारासाठी म्हणजेच बँकेत पैसे जमा करण्याचे वा काढून घेण्याचे अधिकार पक्षाच्या वतीने तीन पदाधिकाऱ्यांना आहेत. यापूर्वी



हे अधिकार राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अजित पवार, राष्ट्रीय महासचिव व (पान ८ वर) (पान १ वरून) कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल व खजिनदार म्हणून वाय. पी. त्रिवेदी या तिघांकडे होते. या तिघांच्या स्वाक्षरीने पक्षाचे आर्थिक व्यवहार होत असत. आता नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीमध्ये प्रत्यक्ष खजिनदाराचे काम जय पवार पाहणार आहेत. म्हणजेच पक्षाच्या अधिकृत आर्थिक व्यवहाराचे सर्वाधिकार राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार, राष्ट्रीय महासचिव म्हणून पार्थ पवार आणि खजिनदार म्हणून जय पवार या तिघांकडेच असतील, या तिघांपैकी एकाच्या स्वाक्षरीने बँकेचे व्यवहार केले जातील. नव्या बदलामध्ये राष्ट्रीय पदाधिकारी म्हणून प्रफुल्ल पटेल वा वाय. पी. त्रिवेदी यांचा समावेश केलेला नाही.

### आर्थिक सूत्रे पटेल यांच्याच ताब्यात

राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतरही पक्षाची आर्थिक सूत्रे प्रफुल्ल पटेल यांच्याच ताब्यात होती. जोपर्यंत ही सूत्रे पटेल यांच्याकडे राहतील, तोपर्यंत पक्षावर पूर्णपणे नियंत्रण मिळवता येणार नाही ही बाब सुनेत्रा पवार व पार्थ पवार या माय-लेकरांच्या लक्षात आल्यामुळे नवी यादी लपवून ठेवली व गुपचूप केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवली, असा दावा केला जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# नीट'प्रकरणी अटकसत्र; राज्यातून चौघे ताब्यात

### देशभरात सीबीआयकडून छापे, विद्यार्थी संघटना आक्रमक

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने पेपरफुटीच्या संशयावरून वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीची नीट-यूजी परीक्षाच मंगळवारी रद्द केल्यानंतर या प्रकरणातील अनियमिततेची चौकशी करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) बुधवारी देशभरात कारवाई केली. आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यात जयपूरमधून तिघे, पुण्यातून दोघे, तर गुरुग्राम, नाशिक, अहिल्यानगरमधून प्रत्येकी एकाला ताब्यात घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये जयपूरमधून मांगिलाल बिवल, विकास बिवल आणि दिनेश बिवल असे तिघे, गुरुग्राममधून यश यादव, नाशिकमधून शुभम खैरनार, अहिल्यानगरमधून धनंजय लोखंडे, पुण्यामधून ब्युटीपार्लर चालक मनीषा वाघमारे व शेषराव सोळंकी या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्याचा समावेश आहे. मांगिलाल व दिनेश हे दोघे बंधू जयपूर शहरानजीक बांधकाम व्यवसायाशी संबंधित आहेत. सिकर येथील विद्यार्थ्याला विकण्यासाठी त्यांनी नीटचा पेपर विकत घेतल्याचा संशय आहे. या अटकेनंतर राजस्थानमध्ये काँग्रेस-भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. दिनेश बिवल हा भाजपचा पदाधिकारी असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी केला. भाजपने हा आरोप फेटाळून



लावला.सीबीआय या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करणाऱ्या राजस्थानच्या विशेष कृती दलाशी (एसओजी) समन्वय साधत आहे. सीबीआयने बुधवारी राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या मुख्यालयाला भेट देऊन परीक्षेसंबंधित कागदपत्रे गोळा केली. तसेच परीक्षा प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांशीही चर्चा केली. ‘नीट २०२६’च्या पेपरफुटीप्रकरणात नाशिकमधून शुभम खैरनार याला मंगळवारी अटक केल्यानंतर त्याला बुधवारी मुंबईतील महानगरदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्याला सीबीआयची दोन दिवसांची तात्पुरती कोठडी (ट्रान्झिट रिमांड) सुनावली. त्यानंतर सीबीआयने त्याला पुढील चौकशीसाठी दिल्लीला नेले.अहिल्यानगर पोलिसांनी राहुरी तालुक्यातील धनंजय लोखंडे (३०) याला ताब्यात घेऊन सीबीआय पथकाच्या हवाली केले. दिल्ली येथे नेण्यासाठी लोखंडे याला बुधवारी सायंकाळी न्यायालयापुढे हजर करण्यात आले होते. सीबीआयने या प्रकरणाचा तपास हाती घेतल्यानंतर बुधवारी देशभरात अनेक ठिकाणी छापे टाकले.

### प्रश्नपत्रिकाफुटीचे धागेदोरे पुण्यापर्यंत

अनेक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. प्रश्नपत्रिका प्रसारित करण्यासाठी कोणत्या ॲप्सचा वापर करण्यात आला होता, याचा शोध घेण्यासाठी ही उपकरणे न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवली जातील.पुणे : ‘नीट’ परीक्षेची प्रश्नपत्रिकाफुटीचे धागेदोरे पुण्यापर्यंत पोहोचले आहेत. पुणे पोलिसांच्या पथकाने बिबवेवाडीतील सुखसागरनगर भागातून एका ब्युटी पार्लरचालक महिलेसह अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्याला बुधवारी ताब्यात घेतले. या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्याकडे चौकशी सुरू आहे,’ अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

Selected

## एमपीएससी कडून ऑप्टिंग आऊट'चा पर्याय बंद !

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) भरती प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा देण्यात आलेला पर्याय (ऑप्टिंग आऊट) बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पर्यायाचा गैरवापर झाल्यामुळे पर्यायच बंद करण्याची वेळ आली. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी या निर्णयाबाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. एमपीएससीने पदभरतीसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (ऑप्टिंग आऊट) २०२२-२३च्या सुमारास लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या पर्यायाद्वारे पदभरती निवड प्रक्रियेत सुधारणा करण्याचा मूळ उद्देश होता. मात्र, या पर्यायाचा उमेदवारांकडून गैरवापर केला जात असल्याच्या, आर्थिक व्यवहार केले जात असल्याच्या चर्चा होत्या. या पार्श्वभूमीवर, आता हा पर्यायच बंद केला जाणार आहे.

# धरणगावच्या सुरक्षिततेस नवे बळ!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते अग्निशमन वाहनाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव | प्रतिनिधी** : धरणगाव शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अत्याधुनिक 'मिनी फायटर' अग्निशमन व रेस्क्यू वाहनाचे लोकार्पण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत धरणगाव नगरपरिषदेला हे अत्याधुनिक वाहन उपलब्ध करून देण्यात आले आहे. राज्यातील ५४ नगरपरिषदांना अग्निशमन व रेस्क्यू वाहने उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून धरणगाव शहराला ही अत्याधुनिक सुविधा मिळाली आहे. ही मिनी फायटर गाडी आता शहरातील कोणत्याही भागात सहज पोहोचून आग विझवण्याचे काम जलद गतीने करू शकणार आहे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी हे वाहन महत्त्वाची भूमिका बजावेल."शहरातील वाढते नागरीकरण, अरुंद रस्ते आणि गल्लीबोळ लक्षात घेता हे वाहन आपत्कालीन परिस्थितीत अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.

अरुंद गल्लीबोळांतही पोहोचणार मदत यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "धरणगाव शहरातील अनेक भागांत मोठ्या अग्निशमन गाड्यांना पोहोचण्यास अडचणी निर्माण होतात. मात्र ही मिनी फायटर गाडी आता शहरातील कोणत्याही भागात सहज पोहोचून आग विझवण्याचे काम जलद गतीने करू शकणार आहे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी हे वाहन महत्त्वाची भूमिका बजावेल." ते पुढे म्हणाले की, "ही गाडी केवळ आग विझवण्यासाठीच नव्हे तर पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थिती, रस्ते अपघात, नैसर्गिक आपत्ती आणि बचावकार्यामध्येही प्रभावीपणे उपयोगात आणली जाईल. शासन नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत असून स्थानिक स्वराज्य संस्थांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे." आधुनिक सुविधांनी सज्ज वाहन या अत्याधुनिक मिनी फायटर वाहनामध्ये अग्निशमन साहित्य, बचाव उपकरणे तसेच विविध आपत्कालीन सेवा साधनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे धरणगाव नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाची कार्यक्षमता अधिक सक्षम होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देण्यास या वाहनाची मोठी मदत होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.विशेष म्हणजे, लोकार्पणानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वतः वाहनात बसून त्याची पाहणी केली व त्यातील आधुनिक सुविधांची माहिती जाणून घेतली.

### या मान्यवरांची कार्यक्रमास उपस्थिती

या कार्यक्रमास मुख्याधिकारी जनार्दन पवार, उपनगराध्यक्षा सुरेखा विजय महाजन, आरोग्य सभापती नितीन बयस, शहर प्रमुख वीरेंद्र पूर्वे, विलास महाजन, पप्पू भावे, अंजली विसावे, कविता पाटील, मंदाकिनी येवले, प्रियंका जाधव, भारती महाजन, लक्ष्मण महाजन, परमेश्वर महाजन, सुनील चौधरी, नीलेश चौधरी, विजय महाजन, बुटा पाटील, रवी महाजन, बाळू जाधव, तौसीफ पटेल, गोविंदा धनगर, पप्पू कंखरे, हेमंत चौधरी, कडू आप्पा, सद्दाम अली, इब्राहिम हाजी, सुदर्शन भागवत, अहमद पठाण, प्रथमेश चौधरी, कल्पेश विसावे, गुलाब मराठे, चेतन जाधव यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## शालेय वाहन कागदपत्र तपासणी बंधनकारक

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** आगामी शैक्षणिक सत्राच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांसाठी महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापूर्वी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूलबस आणि व्हॅनची सर्व कागदपत्रे तपासणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केलेल्या वाहनांना विद्यार्थी वाहतुकीस परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, शाळा व्यवस्थापनांनी त्यांच्या संस्थेशी संलग्न असलेल्या सर्व स्कूलबस, व्हॅन आणि इतर वाहतूक वाहनांची प्रत्यक्ष तपासणी करावी. वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस), वाहन परवाना, पीयूसी प्रमाणपत्र, विमा तसेच इतर आवश्यक कागदपत्रे वैध असल्याची खात्री करूनच विद्यार्थ्यांच्या वाहतुकीस परवानगी द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान कोणत्याही वाहनाची कागदपत्रे अपूर्ण अथवा कालबाह्य आढळल्यास संबंधित वाहनचालक किंवा मालकांना तातडीने ती वैध करून घेण्याच्या सूचना शाळा व्यवस्थापनांनी द्याव्यात. सर्व कागदपत्रे नियमांनुसार पूर्ण झाल्यानंतरच संबंधित वाहनांना विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याची मुभा देण्यात यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर भूमिका विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अपघातमुक्त व्हावी यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणारी किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय चालवली जाणारी वाहने आढळल्यास संबंधित वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## स्वीकृत नगरसेवकांवरून भाजपमध्ये खदखद!

### चार महिने उलटूनही नियुक्त्या रखडल्या

जन सम्राट टाईम्स



**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महापालिका निवडणुकीनंतर तब्बल चार महिने उलटूनही स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्त्या जाहीर न झाल्याने भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. या मुद्द्यावरून भाजपमधील अंतर्गत गटबाजीही आता उघडपणे समोर येत असल्याचे चित्र आहे. महापालिकेत भाजपकडून सात स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार असल्याची चर्चा असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या तीन नावांबाबत तयारी पूर्ण केल्याचे सांगितले जात आहे. मात्र भाजपकडून अद्याप अधिकृत नावे जाहीर न झाल्याने नियुक्ती प्रक्रिया रखडल्याचा आरोप केला जात आहे. मुख्यमंत्र्यांना घंटा भेट आंदोलनाचा प्रयत्न या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्ता सचिन काळभोर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्रालयात 'घंटा भेट' देण्याचा प्रयत्न केला होता. जुन्या कार्यकर्त्यांना न्याय मिळावा आणि त्यांना स्वीकृत नगरसेवक पदावर संधी द्यावी, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार होते. मात्र आंदोलनापूर्वीच निगडी पोलिसांनी काळभोर यांना ताब्यात घेतल्याने कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, पोलिसांनी दबावतंत्र वापरत आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. "जुन्या निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून केवळ आमदार, खासदार, मंत्री आणि मुख्यमंत्री समर्थकांना संधी दिली जाणार का?" असा सवाल आता

### राष्ट्रवादीच्या भूमिकेकडेही लक्ष

१५ मे २०२६ रोजी होणाऱ्या स्थायी समिती सभेतही स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा ठराव ठेवण्यात आलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आगामी काळात या नियुक्त्या होणार की पुन्हा विषय लांबणीवर टाकला जाणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. शहरात भाजपचे चार आमदार असले तरी अंतिम निर्णय हा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्तरावरूनच होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील नेत्यांची भूमिका दुय्यम ठरत असल्याचेही बोलले जात आहे.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीन स्वीकृत नगरसेवक घोषित होणार की त्यांचाही प्रस्ताव फेटाळला जाणार, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. महापालिका आयुक्त या संपूर्ण विषयावर काय भूमिका घेतात, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## पंतप्रधानांच्या आवाहनाचा ज्वेलरी कंपन्यांना फटका!

### चौघांकडून दोन भावांना बेदम मारहाण

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** वाणिज्य प्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला सोन्याची खरेदी टाळण्याचे किंवा ती मर्यादित करण्याचे आवाहन केल्यानंतर भारतीय शेअर बाजारात दागिन्यांशी संबंधित कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. पंतप्रधानांच्या या विधानामुळे सोन्याच्या मागणीत घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर झाला आहे. सोन्याच्या वाढत्या आयातीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि परकीय चलन साठ्यावर होणारा परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले असले तरी, शेअर बाजारात मात्र यामुळे ज्वेलरी क्षेत्रातील कंपन्यांचे शेअर्स लडखडून कोसळले आहेत. या घसरणीचा सर्वाधिक फटका 'टायटन' आणि 'कल्याण ज्वेलर्स' यांसारख्या दिग्गज कंपन्यांना बसला आहे. टायटनच्या शेअर्समध्ये मोठी घट नोंदवण्यात आली असून, कल्याण ज्वेलर्सच्या किमतीतही लक्षणीय घसरण झाली आहे. यासोबतच सेन्को गोल्ड, टीबीझेड आणि इतर स्थानिक ज्वेलरी कंपन्यांच्या शेअर्सवरही विक्रीचा दबाव दिसून आला. गुंतवणूकदारांना भीती आहे की, जर सामान्य जनतेने सोन्याची खरेदी कमी केली, तर या कंपन्यांच्या विक्रीवर आणि तिमाही नफ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे बाजार उघडताच या कंपन्यांच्या मार्केट कॅपमध्ये कोट्यवधी रुपयांची घट झाली. आर्थिक तज्ज्ञांच्या मते, भारताच्या चालू खात्यातील तूट नियंत्रित करण्यासाठी सरकार सोन्याची आयात कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

## पोलीस ठाण्याच्या आवारातच पत्रकाराला धमकी; फेरीवाला लॉबीची दादागिरी उघड

### अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात तक्रार केल्याचा राग

जन सम्राट टाईम्स




**डोंबिवली प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत वाढलेल्या अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात आवाज उठवणाऱ्या एका पत्रकाराला थेट पोलीस ठाण्याच्या आवारातच धमकावण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे शहरातील फेरीवाला लॉबीची वाढती दादागिरी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पत्रकार विनोद प्रेमनारायण गिरी यांनी अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात बातमी प्रसिद्ध करून तसेच संबंधित तक्रार केडीएमसी प्रशासनाकडे दाखल केली होती.

या कारवाईमुळे संतप्त झालेल्या काही फेरीवाल्यांकडून पत्रकारावर दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप आहे. याच पार्श्वभूमीवर १२ मे रोजी डोंबिवली पोलीस ठाण्याच्या परिसरात छाया अमोल खिल्लारे या महिलेने पत्रकार विनोद गिरी यांना धमकी दिल्याचे समोर आले आहे. "तुला बघून घेईल, एक महिला काय करू शकते हे तुला दाखवते," अशा शब्दांत धमकी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे हा प्रकार थेट पोलीस ठाण्याच्या आवारात घडल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला असून, फेरीवाला लॉबी इतकी बेधडक झाली आहे का की ती आता थेट पोलीस ठाण्याच्या परिसरातही धमक्या देऊ लागली आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी मनोज गिरी यांनी डोंबिवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 351(2) अंतर्गत एनसीआर क्रमांक 1708/2026 नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, शहरातील वाढत्या अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांना होणारा त्रास आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेबाबत आधीच प्रश्न उपस्थित होत असताना आता पत्रकारालाच धमकी देण्याच्या घटनेमुळे वातावरण आणखी तापले आहे.

पत्रकार संघटनांकडूनही या घटनेचा निषेध व्यक्त केला जात असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करावी तसेच पत्रकार आणि सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी केली आहे.

### पोलिसांनी पुढील तपास सुरु केला

. या प्रकरणी मनोज गिरी यांनी डोंबिवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 351(2) अंतर्गत एनसीआर क्रमांक 1708/2026 नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, शहरातील वाढत्या अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांना होणारा त्रास आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेबाबत आधीच प्रश्न उपस्थित होत असताना आता पत्रकारालाच धमकी देण्याच्या घटनेमुळे वातावरण आणखी तापले आहे.

## खाटू श्याम भक्तांसाठी खुशखबर! धरणगावहून रेल्वे सेवा सुरू

### हिसार एक्सप्रेसचे धरणगाव स्थानकावर ऐतिहासिक स्वागत

जन सम्राट टाईम्स

**धरणगांव। प्रतिनिधी :** खाटू श्याम भक्तांसाठी अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राजस्थानातील प्रसिद्ध खाटू श्यामजी मंदिरासाठी जाणाऱ्या भाविकांना आता धरणगावहून थेट रेल्वे सेवा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे जळगाव जिल्ह्यासह परिसरातील हजारो भक्तांचा प्रवास अधिक सोयीस्कर, सुलभ आणि किफायतशीर होणार आहे. धरणगाव रेल्वे स्थानकावर आज १७२९५ काकीनाडा टाऊन – हिसार एक्सप्रेसचे उत्साहपूर्ण वातावरणात ऐतिहासिक स्वागत करण्यात आले. या रेल्वे सेवेमुळे आता भक्तांना खाटू श्यामजी मंदिराजवळील रिंगस स्थानकापर्यंत थेट प्रवास करता येणार आहे. यामुळे भाविकांचा वेळ, पैसा आणि प्रवासातील त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. दर बुधवारी सकाळी ९:३० वाजता धरणगावहून सुटणार ट्रेन नवीन रेल्वे सुविधेनुसार, ही ट्रेन दर बुधवारी सकाळी ९:३० वाजता धरणगाव रेल्वे स्थानकावरून रवाना होणार आहे. खाटू श्याम भक्तांसाठी ही सेवा विशेष लाभदायी ठरणार असून राजस्थानला जाणाऱ्या प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी भक्तांना खाटू श्यामजी येथे जाण्यासाठी अनेक रेल्वे बदलून किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. मात्र आता थेट रेल्वे सेवा सुरू झाल्याने प्रवास अधिक सुरक्षित आणि आरामदायी होणार आहे. तिकीट दरात २० ते २५ टक्क्यांपर्यंत सवलत या रेल्वे सेवेमधील आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे प्रवाशांना तिकीट दरात २० ते २५ टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य भक्तांनाही कमी खर्चात खाटू श्यामजीचे दर्शन घेणे शक्य होणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, भविष्यात या मार्गावरील सुविधा आणखी वाढवाव्यात, अशी मागणीही करण्यात येत आहे. भक्तांकडून स्वागत, परिसरात उत्साहाचे वातावरण धरणगाव रेल्वे स्थानकावर ट्रेनच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येने खाटू श्याम भक्त, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. घोषणाबाजी, फुलांची उधळण आणि जल्लोषात या रेल्वे सेवेचे स्वागत करण्यात आले. अनेकांनी ही सेवा भक्तांसाठी "आस्थेचा आणि सोयीचा नवा मार्ग" असल्याची भावना व्यक्त केली.

## उल्हासनगर रुग्णालयात मृत्यू प्रकरण तापले!

### दोषी डॉक्टरांवर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स



**उल्हासनगर | प्रतिनिधी :** उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात उपचारादरम्यान झालेल्या रुग्णाच्या मृत्यूप्रकरणी संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गजानंद लिंबोरे यांनी आक्रमक भूमिका घेत दोषी डॉक्टर आणि रुग्णालय प्रशासनावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, प्रधान सचिव आणि ठाणे जिल्हाधिकारी यांना ईमेलद्वारे अधिकृत तक्रार पाठवत प्रशासनाला जाब विचारला आहे. रुग्णालयातील हलगर्जीपणामुळेच संबंधित रुग्णाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप लिंबोरे यांनी केला आहे. मृत्यूनंतर रुग्णालयात निर्माण झालेला तणाव आणि तोडफोडीच्या घटनांमागेही डॉक्टरांचा अक्षम्य निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. केवळ तोडफोडीवर कारवाई करून चालणार नाही, तर उपचारात कसूर करणाऱ्या डॉक्टरांवरही कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी गजानंद लिंबोरे यांनी आपल्या निवेदनात संबंधित डॉक्टरांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४-अ अंतर्गत तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. "डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका कुटुंबाचा आधार हिरावला गेला असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर संदेश देणे आवश्यक आहे," असे त्यांनी म्हटले आहे. डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याची मागणी उपचारात गंभीर निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांचे वैद्यकीय परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात यावेत, अशीही मागणी त्यांनी केली आहे. तसेच मुख्यमंत्री कार्यालय (CMO) आणि आरोग्य सेवा संचालनालय (DHS) यांच्या माध्यमातून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी विशेष समिती नेमण्याची मागणी करण्यात आली आहे. रुग्णालयातील अनागोंदीवर संताप रुग्णालयात औषधांचा तुटवडा, अपुरी वैद्यकीय सुविधा आणि प्रशासकीय गलथानपणामुळे रुग्णांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या संपूर्ण प्रकाराची जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलली नाहीत, तर संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशाराही गजानंद लिंबोरे यांनी दिला आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## भागवत कथेच्या संस्कारातून खेडीढोकची युवा पिढी निर्व्यसनीतेकडे!

### मनोज महाराज राजपूत ऐनगावकर यांच्याकथेला उत्स्फूर्त प्रतिसाद; ५०० युवक-युवती वारकरी मार्गावर

जन सम्राट टाईम्स



**पुणे | प्रतिनिधी :** तालुक्यातील खेडीढोक गावात आयोजित संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाने गावातील युवा पिढीला नवी दिशा दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भागवत कथेच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संस्कार आणि निर्व्यसनी जीवनाचा संदेश देण्यात येत असून गेल्या दोन वर्षांत तब्बल ५०० युवक-युवतींनी वारकरी संप्रदायाचा स्वीकार करत व्यसनमुक्त जीवनाचा मार्ग निवडला आहे. ह.भ.प. मनोज महाराज राजपूत ऐनगावकर यांनी या भागवत कथेचा समारोप करताना युवा पिढीला अध्यात्म आणि सदाचाराची जोड देण्याची गरज अधोरेखित केली. पालखी सोहळ्याप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, "भागवत कथा ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून माणसातला माणूस जागा करण्याचा प्रयत्न आहे. समाजातील तरुण पिढी व्यसनांच्या आहारी जात असताना कथा, कीर्तन आणि वारकरी संस्कारांच्या माध्यमातून त्यांना योग्य दिशा मिळत आहे." श्री हिंदूसूर्य महाराणा प्रताप जयंती उत्सवानिमित्त ३ ते १० मे दरम्यान खेडीढोक येथे संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात रामायण, श्रीकृष्ण लीला, धार्मिक प्रसंग आणि अध्यात्मिक देखावे सादर करण्यात आले. सजीव झाक्यांमधून धार्मिकता, संस्कृती आणि नैतिकतेचे संदेश देण्यात आले. मनोज महाराज म्हणाले की, "गेल्या पंधरा-सोळा वर्षांपासून वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून कथा-कीर्तन करत धर्म आणि संस्कृती जपण्याचे कार्य सुरू आहे. मात्र आजच्या काळात माणसातील माणूस जिवंत ठेवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. भागवत कथा समाजाला एकत्र आणते आणि व्यसनांपासून दूर ठेवण्याची प्रेरणा देते."गेल्या वर्षी आयोजित भागवत कथेनंतर गावातील सुमारे ३०० युवक-युवतींनी वारकरी माळ धारण करत व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प केला होता. त्यामुळे खेडीढोक गावात सामाजिक परिवर्तनाचे सकारात्मक चित्र निर्माण होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### ग्रामस्थांचे परिश्रम आणि सहकार्य

भागवत कथा सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शक महेंद्र महाराज, रामेश्वर महाराज, पॅडवादक भूषण महाराज नेवासा, तबलावादक कुमार गिरी महाराज कन्नड, आर्गनवादक चेतन महाराज उंदीरखेडे, झाकी प्रदर्शन प्रमुख नितीन महाराज विटनेरकर, प्रदीप राजपूत तसेच खेडीढोक ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. धार्मिकतेसोबतच समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या भागवत कथेमुळे खेडीढोक गावात अध्यात्म आणि सामाजिक परिवर्तनाचा सुंदर संगम पाहायला मिळत आहे.